

॥ वर्ष - 8 । अंक -98 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



कोजागिरी पौर्णिमा निमित्त हार्दिक शुभेच्छा!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 16 ऑक्टोबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## विलास लांडे नेमके कोणत्या गटात

# 'साहेब' की, 'दादा'?

### विलास लांडेंच्या आट्यापाट्यामुळं कार्यकर्ते संभ्रमात

। पुणे । महाईन्यूज

**राष्ट्रवादीचे नेते व भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. लोकसभा निवडणुकीनंतर लांडे यांनी दुसऱ्यांदा शरद पवारांची भेट घेतली आहे. दरम्यान, ते अजित पवारांच्या कार्यक्रमांनाही उपस्थित राहिले होते. त्यामुळे विलास लांडे नेमके कोणत्या गटात आहेत किंवा ते पक्षांतर्गतच कोलांट्या उड्या घेत आहेत का, अशी चर्चा सुरू झाली आहे.**






विलास लांडे हे यंदाच्या निवडणुकीत शिरुरच्या मैदानात उतरण्यास इच्छुक आहेत. पण मतदारसंघातील बदलेल्या राजकीय समीकरणांमुळे महायुतीतून विधानसभेत जाण्याची वाट बिकट ठरत आहे. यामुळे त्यांची शरद पवारांशी चर्चा सुरु असल्याचे बोलले जातेय. यातच त्यांनी आज पुण्याच्या मोदी बागेतील शरद पवार यांच्या निवासस्थानी भेट दिली. लांडे यांच्यासोबत अजित गव्हाणे आणि इतर कार्यकर्तेही उपस्थित होते. मात्र, राष्ट्रवादी पक्षात दोन दगडांवर पाय ठेवल्याने त्यांची राजकीय भूमिका अद्याप स्पष्ट होऊ शकलेली नाही.

'तुम्ही शरद पवारांची लपून छपून भेट घेतली का?' असा प्रश्न विचारला असता, लांडे म्हणाले, 'मी कधी लपून छपून भेट घेत नाही. पवारांसोबत आम्ही कायम आहोत. साहेब आमचे दैवत आहेत, सर्वसामान्यांचा नेता आहे.' आम्ही शिरुर आणि पिंपरी मधील विधानसभा उमेदवारीबाबत चर्चा करण्यासाठी पवार साहेबांना भेटायला आलो, असेही लांडे यांनी स्पष्ट केले.

### अजितदादांनी दिलेला उमेदवार मान्य नव्हता

लोकसभा निवडणुकीत तुम्ही अजित पवारांच्या उमेदवाराचा प्रचार केला का, यावर लांडे म्हणाले की, 'हा तुमचा गैरसमज आहे. लोकसभा निवडणुकीत आम्ही साहेबांसोबतच होतो. अजित पवारांनी दिलेला उमेदवार आम्हाला पटलाच नव्हता,' असे म्हणत त्यांनी शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यावर टीका केली आहे. 'अजित पवारांची साथ तुम्ही सोडली का?" या प्रश्नावर लांडे म्हणाले, 'अजित दादांशी आमचे वैयक्तिक संबंध आहेत, ते राजकारणाच्या पलीकडे आहेत.' यामुळे माजी आमदार लांडे हे उमेदवारीसाठी पक्षांतर करणार की अजितदादांसोबतच राहणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## प्रदूषण कमी करण्यासाठी पीसीएमसी महापालिकेने उचलले मोठे पाऊल

### राष्ट्रीय निर्धारीत योगदानानुसार देशाने 2070 पर्यंत कार्बन उत्सर्जन शून्यापर्यंत आणण्याचे उद्दिष्ट

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।



हापालिकेने २०५० पर्यंत कार्बन उत्सर्जन शून्यापर्यंत आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यासाठी शहराचा वातावरणीय कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे. त्याकरिता 'वातावरणीय कृती कक्ष' स्थापन करण्यात येणार आहे. राष्ट्रीय निर्धारीत योगदानानुसार देशाने २०७० पर्यंत कार्बन उत्सर्जन शून्यापर्यंत आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्याअनुषंगाने शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने राज्यातील सर्व अमृत शहरे, जिल्हे व महसूल विभागाअंतर्गत वातावरणीय कृती कक्ष स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. अमृत अंतर्गत समाविष्ट असलेल्या महाराष्ट्रातील ४३ प्रमुख शहरांमधील लोकसंख्येचे प्रमाण हे राज्याच्या नागरी लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणाच्या ७६ टक्के आहे. वाढती लोकसंख्या, झपाट्याने होत असलेले शहरीकरण, सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक विविधता तसेच जैवविविधता असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराला सध्या वाढते तापमान, उष्णतेच्या लाटा, अतिवृष्टी, पूर आणि वीज पडणे अशा पर्यावरणीय संकटांचा सामना करावा लागत आहे.

### कार्बन उत्सर्जनासाठी विविध उपाययोजना

कार्बन उत्सर्जन करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जाणार आहेत. त्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे. वातावरणीय कृती कक्षामध्ये स्वयंसेवी संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींचाही समावेश करण्यात येणार आहे असे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी सांगितले.

# शहरासाठी 1 हजार नव्या ई-बसचा प्रस्ताव

## केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचा पाठपुरावा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरात मेट्रो मार्गिकांचे जाळे विस्तारत असतानाच पीएमपीचे सक्षमीकरण करण्यासंदर्भात वीजेवर धावणाऱ्या (ई-बस) एक हजार नव्या बस खरेदीचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी तसा प्रस्ताव केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांना दिला आहे.**



त्यानुसार या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश कुमारस्वामी यांनी त्यांच्या विभागातील अधिकाऱ्यांना दिले आहेत.शहरात मेट्रो प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याअंतर्गत वनाज ते रामवाडी आणि पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट या दोन मार्गावरील प्रवासी सेवा पूर्ण क्षमतेने सुरू झाली आहे. या दोन्ही मार्गिकांची एकूण लांबी ३२ किलोमीटर एवढी आहे. त्यातच खडकवासला ते खराडी आणि नळस्टॉप ते माणिकबाग या दोन नव्या उन्नत मार्गिकांनाही राज्याच्या मंत्रिमंडळाने परवानगी दिली आहे.

तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून 'बांधा-वापरा-हस्तांतरित करा' या तत्वावर शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो मार्गिकेचे काम सध्या सुरू आहे. शहरात एकीकडे मेट्रोचे जाळे विस्तारत असताना दुसरीकडे पीएमपीच्या सक्षमीकरणालाही प्राधान्य देण्यात आले आहे.पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील प्रवाशांची संख्या लक्षात घेता पीएमपीच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या अपुरी आहे. या दोन्ही शहरातील लोकसंख्या आणि प्रवासी लक्षात घेता ताफ्यात किमान तीन हजार गाड्यांची आवश्यकता आहे. गेल्या काही महिन्यात केंद्र सरकारच्या माध्यमातून शहराला वीजेवर धावणाऱ्या (ई-बस) ४०० गाड्या प्राप्त झाल्या आहेत. मात्र प्रवाशांचा प्रवास सुखकर, जलद आणि सुरक्षित व्हावा, यासाठी नव्याने एक हजार गाड्यांचा प्रस्ताव केंद्र सरकारला देण्यात आला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेत आल्यापासून शहराचा सर्वांगिणक आणि सुनियोजित विकास सुरू झाला आहे. पीएमपीच्या ताफ्यातील संख्या, आवश्यकता आणि भविष्यातील गरज लक्षात घेता एक हजार गाड्या घेण्याचा प्रस्ताव केंद्रीय मंत्र्यांना देण्यात आला आहे. त्यासंदर्भात तातडीने सकारात्मक कार्यवाही करण्याचे आदेश केंद्रीय अवजड मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. .शहरात मेट्रो प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याअंतर्गत वनाज ते रामवाडी आणि पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट या दोन मार्गावरील प्रवासी सेवा पूर्ण क्षमतेने सुरू झाली आहे. या दोन्ही मार्गिकांची एकूण लांबी ३२ किलोमीटर एवढी आहे. त्यातच खडकवासला ते खराडी आणि नळस्टॉप ते माणिकबाग या दोन नव्या उन्नत मार्गिकांनाही राज्याच्या मंत्रिमंडळाने परवानगी दिली आहे.

### वीजेवर धावणाऱ्या 400 गाड्या प्राप्त

तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून 'बांधा-वापरा-हस्तांतरित करा' या तत्वावर शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो मार्गिकेचे काम सध्या सुरू आहे. शहरात एकीकडे मेट्रोचे जाळे विस्तारत असताना दुसरीकडे पीएमपीच्या सक्षमीकरणालाही प्राधान्य देण्यात आले आहे.पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील प्रवाशांची संख्या लक्षात घेता पीएमपीच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या अपुरी आहे. या दोन्ही शहरातील लोकसंख्या आणि प्रवासी लक्षात घेता ताफ्यात किमान तीन हजार गाड्यांची आवश्यकता आहे. गेल्या काही महिन्यात केंद्र सरकारच्या माध्यमातून शहराला वीजेवर धावणाऱ्या (ई-बस) ४०० गाड्या प्राप्त झाल्या आहेत.

# पुण्यात अजित पवार गटाला धक्का!

## मानकर यांची नियुक्ती न झाल्याने 600 पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मागील कित्येक महिन्यापासून राज्यपाल नियुक्त विधान परिषद आमदारांच्या नियुक्त्या प्रलंबित होत्या. या नियुक्त्या कधी होणार याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागून राहिले असताना विधानसभा निवडणुकीचा आचारसंहिता कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वी काही तास अगोदर महायुतीकडून राज्यपालांकडे सात नावे पाठविण्यात आली होती.**



त्या सात सदस्यांच्या नावांना राज्यपालांनी सहमती दर्शविल्यानंतर आज उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी या सर्व सदस्यांना आमदारकीपदाची शपथ दिली. हेमंत पाटील, शिवसेना (एकनाथ शिंदे), मनिषा कायंदे, शिवसेना (एकनाथ शिंदे), पंकज भुजबळ राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), इद्रिस इलियास नाईकवाडी, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), महंत बाबुसिंग महाराज, बंजारा समाजाचे धर्मगुरु (भाजपा), विक्रांत पाटील (भाजपा), चित्रा वाघ (भाजपा) यांचा विधान परिषदेवर पाठवण्यात आले आहे. या राज्यपाल नियुक्त आमदारकीवरून महायुतीमधील अजित पवार गटामध्ये नाराजी पाहण्यास मिळत आहे. अजित पवार गटाचे पुणे शहर अध्यक्ष दीपक मानकर यांना राज्यपाल नियुक्त आमदारकी देण्यात आली नाही. त्या पार्श्वभूमीवर अजित पवार गटाचे पुणे शहर उपाध्यक्ष दत्ता सागरे यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक झाली.मागील दीड वर्षाच्या काळात दिपक मानकर यांनी मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम घेऊन पक्ष शहर पातळीवर कायम चर्चेत ठेवले आहे. दिपक मानकर कुठे कमी पडले हे पक्ष नेतृत्वाने सांगावे, पक्षातील एका वरिष्ठ नेत्यांच्या कुटुंबात किती पदे देणार, असे म्हणत नाव न घेता छगन भुजबळ यांचे चिरंजीव पंकज भुजबळ यांच्या आमदारकीवर देखील आक्षेप घेण्यात आला. तसेच महिला प्रदेश अध्यक्षपद आणि महिला आयोगाचे अध्यक्षपद एकाच व्यक्तीला. त्या पाक्षातील इतर नेत्यांना मोठे होऊ देत नाही, असा आरोप नाव न घेता रुपाली चाकणकर यांच्यावर करण्यात आला. यासह अनेक मुद्दे या बैठकीत उपस्थित करित रुपाली चाकणकर यांच्याबाबत देखील

### पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली

बैठकीत ६०० प्रमुख पदाधिकाऱ्यांनी एकमताने पदाचा राजीनामा देत यापुढील काळात केवळ कार्यकर्ता म्हणूनच काम करणार असल्याचे जाहीर केले. तसेच येत्या दोन दिवसांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन आमची गाऱ्हाणी मांडणार असल्याचे देखील पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या राज्यपाल नियुक्त आमदारकीवरून महायुतीमधील अजित पवार गटामध्ये नाराजी पाहण्यास मिळत आहे. अजित पवार गटाचे पुणे शहर अध्यक्ष दीपक मानकर यांना राज्यपाल नियुक्त आमदारकी देण्यात आली नाही. त्या पार्श्वभूमीवर अजित पवार गटाचे पुणे शहर उपाध्यक्ष दत्ता सागरे यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक झाली.

## सेवा-सुरक्षा-समर्पण पंधरवड्यात

# विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग!

### 1 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी; भाजपा आमदार महेश लांडगे यांचा उपक्रम



। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराबद्दल तुम्हाला काय वाटते? शहरातील कोणते प्रकल्प तुम्हाला आवडतात? या प्रकल्पांमधून तुम्ही काय बोध घेतला? प्रकल्पांबद्दल तुम्हाला काय माहिती आहे? असे अनेक प्रश्न भोसरी परिसरातील शाळांमधील विद्यार्थ्यांसमोर ठेवले आणि तब्बल एक लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आणि आपली मते मांडली आहेत.**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवसपासून ते महात्मा गांधी आणि लालबहाद्दूर शास्त्री यांच्या जयंतीपर्यंत देशभरात सेवा-सुरक्षा-समर्पण पंधरवडा साजरा केला जातो. समाजामध्ये सेवा कार्याचे महत्व वाढावे आणि राष्ट्राप्रती समर्पण भावना जागृत व्हावी. तसेच, नागरी सुरक्षाबाबत जनजागृती करावी. यासाठी भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून देशव्यापी उपक्रम राबवले जातात. भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये आमदार महेश लांडगे यांनी हा उपक्रम सक्षमपणे राबवला. त्याला विद्यार्थी आणि शाळांनी मोठा प्रतिसाद दिला आहे.

सेवा सुरक्षा समर्पण पंधरवड्यामध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात आले. भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून शहरातील महापालिका आणि खासगी शाळांमध्ये निबंध, वक्तृत्व आणि चित्रकला स्पर्धांचे आयोजन केले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी चक्क शहरात उभारल्या जाणाऱ्या संविधान भवनाबाबत निबंध आणि चित्रकलेतून आपले मत व्यक्त केले.

या उपक्रमाच्या समन्वयक श्रद्धा पानमंद म्हणाल्या की, पिंपरी-चिंचवड शहराची भौतिक संरचना, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून साकारलेला 'वेस्ट टू एनर्जी' हा कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्प, संविधान भवन व इंटरनॅशनल लायब्ररी, नमामी इंद्रायणी, छत्रपती संभाजी महाराज यांचा 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण', मेट्रो सिटी पिंपरी-चिंचवड, स्पोर्ट्स हब पिंपरी-चिंचवड, क्लिन सिटी-ग्रीन सिटी, आरोग्य क्षेत्रात आत्मनिर्भर पिंपरी-चिंचवड, एज्युकेशन हब, देव-देश- धर्म अन् संस्कृती, चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर विकासाचे रोल मॉडेल, जलस्वयंपूर्ण पिंपरी-चिंचवड, ऑटो, आयटी अन् इंडस्ट्रिअल हब यांसारखे विषय विद्यार्थ्यांसमोर होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा. प्रकल्पांचा अभ्यास करावा आणि त्यातून त्यांना नवनवीन कल्पना सूचाव्यात. ज्याचा शहर विकासाच्या दृष्टीने देखील फायदा होईल, असे स्पर्धांचे स्वरुप आहे.

भोसरी विधानसभा मतदार संघ आणि परिसरातील विविध शाळांमध्ये या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. १२० शाळांनी यामध्ये सहभाग नोंदवला. ज्यामध्ये सुमारे एक लाख विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पना चित्रांच्या माध्यमातून पुढे आणल्या. काहींनी निबंधाच्या स्वरूपात तर काहींनी वक्तृत्वातून आपल्या भावना मांडल्या.



> पिंपरी-चिंचवड शहराची वाटचाल शाश्वत विकासाच्या दिशेने सुरू आहे. त्यासंदर्भात महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आहेत. त्याबाबत जनजागृती व्हावी. नव्या पिढीला शहरातील प्रकल्प आणि त्यांची भविष्यातील उपयोगिता याबाबत माहिती मिळावी. यासाठी आम्ही 'सेवा-सुरक्षा-समर्पण' पंधरवड्यानिमित्त शालेय स्पर्धा आयोजित केल्या. त्याला मोठ्या प्रमाणात विद्यार्थी आणि शाळांनी प्रतिसाद दिला. सदर अभियान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील 'बलशाली भारत' घडवण्यासाठीचा छोटासा प्रयत्न आहे.
>
> **– महेश लांडगे,**
> आमदार भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# काँग्रेसमधील इच्छुकांच्या मुलाखती उत्साहात

### पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघातील निरीक्षकांच्या उपस्थितीत मुलाखती

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज




विधानसभेच्या निवडणुकीचे पडघम वाजले आहेत. यामध्ये काँग्रेस पक्षाने आघाडी घेत सर्व मतदारसंघांमध्ये इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. महाराष्ट्र राज्याच्या सर्वच विधानसभा क्षेत्रात ज्या इच्छुक उमेदवारांनी पक्षाकडे उमेदवारी अर्ज केला होता त्या सर्वांची निरीक्षकांच्या उपस्थितीत मुलाखती पार पडल्या.

याच पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड व भोसरी मतदारसंघातील सर्व इच्छुक उमेदवारांची पुणे काँग्रेस भवन येथे निरीक्षक आमदार यशोमती ठाकूर यांनी मुलाखती घेतल्या. याप्रसंगी पिंपरी चिंचवड शहर काँग्रेस अध्यक्ष डॉ. कैलास कदम, पुणे शहराचे अध्यक्ष अरविंद शिंदे, पुणे ग्रामीण काँग्रेसचे अध्यक्ष आमदार संजय जगताप, पुणे लोकसभा निरीक्षक अजित दरेकर आदी मान्यवर उपस्थित होते. चिंचवड (२०५) या मतदारसंघातून डॉ. कैलास कदम, संदेश नवले, तुकाराम भोंडवे, प्रियंका मलशेट्टी कदम, सज्जी वर्की, सायली नढे, शशी नायर, राजन नायर, भरत वाल्हेकर यांनी मुलाखती दिल्या. पिंपरी (२०६) मतदार संघातून विश्वनाथ जगताप, मनोज कांबळे, बाबासाहेब बनसोडे, गौतम आरकडे, शामला सोनवणे, ज्योती गायकवाड, डॉ. मनीषा गरुड, चंद्रकांत लोंढे, पंकज बगाडे, अर्चना राऊत यांनी तर भोसरी (207) मतदार संघातून सोमनाथ शेळके, विठ्ठल शिंदे, स्मिता पवार या सर्व इच्छुक उमेदवारांनी मुलाखती दिल्या.

#### महाविकास आघाडीला फायदा होणार

पिंपरी चिंचवडमध्ये शहर काँग्रेसचे तळागाळात काम आहे व त्यामुळे काँग्रेस पक्षातील सर्वसामान्य कुटुंबातील कोणत्याही निष्ठावंत सैनिकास एकमताने उमेदवारी द्यावी अशी पक्षश्रेष्ठींना साद घालण्यात आली. काँग्रेस पक्षाचे मतदार पिंपरी चिंचवड शहरांमध्ये तिन्ही मतदारसंघात भरपूर प्रमाणात आहेत. याचा निश्चित महाविकास आघाडीला फायदा होणार आहे. बूथ स्तरावरची पक्षाची बांधणी अत्यंत चांगल्या प्रकारे सुरू आहे, त्यामुळे पक्षश्रेष्ठी जो मतदार संघ व उमेदवार देईल त्या उमेदवारास एक दिलाने काम करून निवडून आणण्यासाठी काँग्रेस पक्षातील सर्व कार्यकर्ते दिवस रात्र काम करतील असे आश्वासन शहराध्यक्षांच्या वतीने निरीक्षकांना देण्यात आले.



## भूमिका

# सत्ताधाऱ्यांना खंत जनाधार घटल्याची!

**गोळ्या घालून एखादा विषय संपत असेल तर राज्यातच काय देशभरातील तुरुंगांत असंख्य बलात्कारी आहेत ज्यांना साधा जामीन मिळत नाही. स्त्रियांवर अत्याचार करणारे नराधमच असतात. त्यांना भरचौकात फासावर लटकवा, असा आक्रोश नेहमीच होत आला आहे, मात्र प्रत्यक्षात तसे कधी घडले नाही कारण कायद्याचा धाक आजही आहे.**

परंतु बदलापूर बलात्कार प्रकरणाबाबत आता असे म्हणता येणार नाही. सत्ताधारी आज एखाद्या भीषण घटनेकडे दुर्लक्ष व्हावे म्हणून लगेच एखादी लोकप्रिय घोषणा करतात पण तरीही त्यांची चिंता कमी होत नाही कारण त्यांना खंत आहे ती विरोधकांचा जनाधार वाढल्याची!बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदेला पोलीस चकमकीत ठार केले याबद्दल कोणालाही वाईट वाटले नाही. त्याने केलेल्या गुन्ह्याबाबत त्याला आणखी कठोर शासन होणे गरजेचे होते. आजन्म कठोर कारावास होतो तेव्हा गुन्हेगाराला मृत्यू आलेला बरा असे वाटू लागते आणि तीच त्याच्या गुन्ह्यांची खरी कठोर शिक्षा ठरते. अक्षय शिंदेच्या पहिल्या पत्नीने लैंगिक अत्याचाराची तक्रार केली होती. अक्षय शिंदेला चौकशीसाठी घेऊन जात असताना पोलिसांची बंदूक हिसकावून त्याने पोलिसांवर गोळी चालवली. पोलिसांनी स्वरक्षणासाठी गोळीबार केला



आणि त्यात अक्षयचा मृत्यू झाला. या घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित केले गेले. अक्षयच्या वडिलांनी त्याच्या मृत्यूचा एसआयटी तपास करण्यात यावा, अशी याचिका मुंबई उच्च न्यायालयात केली आहे. याचिकाकर्त्यांच्या वकिलाकडून काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर बोट ठेवण्यात आले. एन्काऊंटर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा, सीसीटीव्ही चित्रण जाहीर करा अशी मागणी हायकोर्टातील सुनावणी दरम्यान याचिकाकर्त्यांनी केली. तसेच अक्षय शिंदे याच्या वडिलांच्या वकिलांनी दावा केला की, पोलिसांवर हल्ला करण्याचा अक्षयचा हेतू नव्हता, तसेच त्याने पालकांकडे दुपारी मनीऑर्डरची मागणी केली होती. अक्षय शिंदे याची हल्ला करण्याची हिंमत नव्हती. 'मोठ्या लोकांना' वाचवण्यासाठी अक्षयचा खून झाला असल्याचा दावा या याचिकेत करण्यात आला. या दाव्यासोबतच वकिलांनी समाजमाध्यमांवरील देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करणारे 'देवाभाऊचा न्याय' हे स्क्रीनशॉट न्यायालयात सादर केले. 'बदला'पुरा' सारखे त्या काळातील होर्डिंग्ज सर्वांनीच पाहिले. सत्ताधाऱ्यांना बलात्कार करणाऱ्या नराधमच्या पोलीस चकमकीतील मृत्यूचेही श्रेय घ्यावेसे वाटावे यावरून यांच्या मनातील राजकीय असुरक्षिततेचे चित्र स्पष्ट होत होते. विरोधकांनीही त्यावरच बोट ठेवले होते. सत्ताधाऱ्यांना त्याची खंत वाटणे अपेक्षित होते, मात्र तसे न होता ते पुन्हा विरोधकांवरच बरसले. विधानसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना विरोधक घरी पाठवणार याबाबत खात्री झाल्यामुळेच 'खेद... खंत' सारखे विचार मांडले जात आहेत. बलात्काराचा कायदा भारतीय दंड संहिता, १८६० मध्ये कलम ३७५ पासून कलम ३७६ई पर्यंत मांडलेला आहे. बलात्कारासाठी १० वर्षे कारावास ते जन्मठेपेची शिक्षा, दंडासह केली जाते. पीडितेचे वय १६ वर्षांपेक्षा कमी असेल, तर गुन्हेगाराला २० वर्षे कारावास ते उर्वरित जन्मठेपेची शिक्षा, दंडासह केली जाते. पीडित व्यक्ती १२ वर्षांपेक्षा कमी वयाची असेल तर गुन्हेगाराला फाशीची शिक्षा दिली जाऊ शकते. यानुसार अक्षय शिंदेला फाशीची शिक्षा होण्याची शक्यता दाट होती.पोलीस चकमकी करून गुन्हेगारांना यमसदनी पाठवायचे झाल्यास देशातील हजारभर तुरुंगात असे अनेक नराधम शिक्षा भोगत आहेत, त्यांच्यापैकी अनेकांबाबत जनतेने सर्वांसमक्ष फाशी द्या अशी मागणी तिरमिरीतून केली असेलच, पण प्रत्यक्षात कायद्याने तसे करता येत नाही. देशातील कारागृहांची अवस्था बिकट आहे. बहुतांश कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा किती तरी अधिक कैदी आहेत. कच्च्या कैद्यांची संख्या भरमसाट असून त्यांची अवस्था दयनीय असते. जामीनसाठी पैसे नसतात. काही जण खोट्या गुन्ह्यात अडकले वा अडकवले असल्याचा दावा करतात.त्यांचे काय करायचे? पोलीस चकमकीनंतर 'बदला'पुरा' म्हणून होर्डिंग लावणे, गृहमंत्र्यांचे पिस्तूल हाती घेतलेले छायाचित्र लावणे हे सत्ताधाऱ्यांना शोभले का?

## प्रासंगिक »

### 'कॅनडा'कटकटाऊ

***एकमेकांच्या उच्चायुक्तांसह सहा मुत्सद्द्यांना भारत व कॅनडाने हाकलले. पण भारतावर दरवेळी तेच आरोप करण्याइतके त्या देशाचे पंतप्रधान निर्ढावले कसे?***

जवळपास अर्धा डझनभर मुत्सद्द्यांची परस्परांच्या राजधानीतून हकालपट्टी आधुनिक जगात केली जाते, जेव्हा दोन देश परस्परांशी युद्धाच्या समीप असतात. किंवा, एका देशाने दुसऱ्या देशाच्या हद्दीत एकतर्फी लष्करी घुसखोरी करून त्या देशाचे ऐक्य आणि सार्वभौमत्व धोक्यात आणलेले असते. भारत आणि कॅनडा यांच्यादरम्यान असे काहीही घडलेले नाही किंवा संभवतही नाही. तरीदेखील अत्यंत टोकाच्या राजनैतिक साठमारीत दोन्ही देश गुंतलेले आहेत. हरदीपसिंग निज्जर या शीख विभाजनवाद्याच्या हत्येमध्ये भारतीय उच्चायुक्तांचाही अप्रत्यक्ष सहभाग होता असा खळबळजनक, काहीसा बेजबाबदार आरोप कॅनडाने केल्यामुळे भारत सरकार संतप्त होणे स्वाभाविक आहेम्हणजे भेट झाली होती. त्या भेटीचा वृत्तान्त दोन देशांनी ज्या प्रकारे सादर केला.

लोकांना तात्काळ खुश करणाऱ्या फुकट्या योजना आणि जातीवर आधारित राजकारण या दोन बाबी निवडणुकीतील विजयाला मुख्यतः कारण ठरत आहेत. नशा आणणारे धर्माचे राजकारण जोडीला असल्यास अधिक चांगले परिणाम साधता येतात, असेही काही नेत्यांना वाटत असल्याचे दिसून येते.

# हरियाणाची पुनरावृत्ती कशी टाळता येईल?

खरे तर बेरोजगारी, महागाई, पक्षांची सामाजिक-राजकीय-आर्थिक धोरणे या बाबींचा लोकांवर अधिक प्रभाव पडला पाहिजे. परंतु आपले शाश्वत आणि दीर्घकालीन हित कशात आहे, हे जनतेच्या लवकर लक्षात येत नाही, हे मानायला आधार आहे. त्याचा फायदा राजकीय पक्ष न घेतील, तर नवलच. वरील गृहीतकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सध्याच्या राजकीय वातावरणाचा आढावा घेणे योग्य ठरेल. या दृष्टीने विचार केल्यास महाराष्ट्रात युतीचे पारडे जड आहे, असे प्रथमदर्शनी वाटते. सत्ता असल्यामुळे जनतेला खुश करणाऱ्या फुकट्या योजना आणि समाजाच्या सर्व घटकांना खुश करणारे निर्णय घेण्याची क्षमता युती सरकारकडे आहे.कोणी काहीही म्हणो, पण लाडकी बहीण योजनेचा ग्रामीण भागात अपेक्षित परिणाम साधला जात असल्याचे दिसते. गरीबीचे चटके सोसणाऱ्यांना १५०० रुपयेही बरीच मोठी रक्कम वाटते. घरात तीन-चार बायकांच्या नावावर येणारे साडेचार ते सहा हजार रुपये



गरिबांसाठी आकर्षकच ठरत आहे. विरोधक कितीही आरडाओरडा करोत, लाडक्या बहिणीची असुरक्षितता हा मुद्दा सत्ताधाऱ्यांसाठी फार अडचणीचा ठरत असल्याचे आढळत नाही. लोकांच्या प्रत्यक्ष गळ्यापर्यंत येईपर्यंत असे मुद्दे लोकांना प्रभावित करत नाहीत. तसेच शेतमालाला किफायतशीर भाव मिळाल्यास शेतकऱ्यांकडे या १५०० रुपयांपेक्षा कितीतरी अधिक पैसे येतील, हे खरे असले, तरी ते विचारांना ताण दिल्यावरच कळते. पण सामान्य माणसावर ठोस लभाचाच, ते कितीही नगण्य असले तरी, अधिक परिणाम होतो. ठोस आणि तत्काळ लाभापुढे लक्षणीय प्रमाणातील, पण शक्यतेच्या अवकाशातील फायदे लोकांमध्ये कोणतीही उत्सुकता निर्माण करत नाहीत. युतीच्या नेत्यांना हे चांगलेच माहीत आहे. किंवा त्यांना त्याबद्दल खात्रीच आहे. म्हणूनच असे अशाश्वत, पण ठोस लाभ देणारे अनेक निर्णय घेण्याचा या शासनाने सपाटाच लावला आहे. पूर्वी राजकीय पक्ष निवडणुकीच्या तोंडावर वारेमाप पैसे वाटत असत. आताही ते करीत असतीलच, पण त्या सोबत ते आता उघड उघड लोकांच्या पैशांतूनच असे वाटप करत असल्याचे दिसत आहे. वर लोकांच्याच पैशांची उधळपट्टी करून या योजनांचा प्रचारही करत आहेत. या योजनांचा युतीला फायदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.युती सरकारने मराठा आंदोलनाची हाताळणी योग्य पद्धतीने केलेली नाही, असे बऱ्याच जणांना वाटते. त्यात काही प्रमाणात तथ्य आहे, असेच वाटते. परंतु याबाबतीत थोडा वेगळा विचारही करता येतो. फडणवीस यांच्याविरुद्ध आंदोलकांच्या मनात असलेला संताप फडणविसांना ओबीसींच्या जवळ आणत आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ठरलं! महाराष्ट्रात गुलाल कुणाचा?

## बिगुल वाजलं, 20 नोव्हेंबरला मतदान, 23 नोव्हेंबरला निकाल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या काही दिवसांपासून राज्यातील विधानसभा निवडणूक केव्हा जाहीर होणार याची सर्वच राजकीय पक्षांना उत्सुकता लागली होती. अखेर आज विधानसभा निवडणुकीची तारीख जाहीर झाली आहे. निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेत निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. यावेळी महाराष्ट्राबरोबरच आणि झारखंड विधानसभेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. आता निवडणूक आयोगाने निवडणुकीची तारीख जाहीर करताच यावर विविध राजकीय प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे.**



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची तारीख आणि निकाल या दोन्हीची तारीख जाहीर झाली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज ही घोषणा केली. गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात निवडणूक कधी जाहीर होणार? याच्या चर्चा रंगल्या होत्या. काही दिवसांपूर्वी राजीव कुमार यांनी पत्रकार परिषद घेतल २६ नोव्हेंबरच्या आधी निवडणूक घेतली जाईल, असं म्हटलं होतं. आज अखेर या निवडणुकीची आणि निकालाच्या दिवसाची घोषणा झाली आहे.आम्ही काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राचा दौरा केला होता. त्या दौऱ्यादरम्यान आम्ही निवडणुकीची तयारी योग्य प्रकारे झाली आहे की नाही? याची माहिती आम्ही घेतली.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी काही गोष्टी घडल्या होत्या त्या टाळण्यासाठी आम्ही आता पूर्णपणे प्रयत्न करत आहोत. लोकांची मतदानासाठी रांग लागते त्यावेळी काही अंतरावर खुर्ची किंवा बाक रचण्याचा सल्ला आम्ही दिला आहे. ८५ वर्षे आणि त्यावरच्या मतदारांना घरुन मतदान करता येणार आहे. तसंच या मतदारांच्या गोपनीयतेची काळजी आम्ही घेऊ त्यासंदर्भातली पूर्ण व्यवस्था आम्ही केली आहे असंही राजीव कुमार यांनी स्पष्ट केलं. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना त्यांची पार्श्वभूमी तीनवेळा वृत्तपत्रात द्यावी लागेल. आम्ही जेव्हा महाराष्ट्रात बैठका घेतल्या तेव्हा आम्ही त्यासंदर्भातले कठोर निर्देश आम्ही राज्य निवडणूक आयोग आणि इतर अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. असंही राजीव कुमार यांनी सांगितलं आहे. निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव आहे. त्यात सर्व मतदारांचा सहभाग आवश्यक आहे.महाराष्ट्रात एका टप्प्यात निवडणूक घेतली जाणार आहे. २० नोव्हेंबरला एका टप्प्यात निवडणूक घेतली जाणार आहेत. तर २३ नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी ही माहिती दिली आहे. गॅझेट नोटिफिकेशनची तारीख २२ ऑक्टोबर असेल तर २९ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख असेल. ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी केली जाणार आहे. तर अर्ज मागे घेण्याची तारीख ४ नोव्हेंबर २०२४ अशी असणार आहे. २० नोव्हेंबरला महाराष्ट्राची निवडणूक एका टप्प्यात होईल. तर २३ नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागेल. महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाले असतानाच भाजपने दिल्ली विधानसभेची तयारी सुरू केली आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये दिल्ली विधानसभेची निवडणूक होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर भाजपने दिल्लीसाठी निवडणूक प्रभारी आणि सहप्रभारी जाहीर केले आहेत. भाजपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि खासदार वैजयंत पांडा यांना दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी प्रदेश प्रभारी म्हणून तर खासदार अतुल गर्ग यांना सहप्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या मान्यतेने राष्ट्रीय सरचिटणीस अरुण सिंह यांनी नियुक्त्या जारी केल्या आहेत.केंद्रात आणि देशातील बहुतांश राज्यांमध्ये भाजपची सत्ता आहे. असे असले तरी भाजपला मागच्या अडीच दशकापासून दिल्ली विधानसभा काबीज करता आली नाही. मागील पंधरा वर्षे अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाची सत्ता दिल्लीत आहे. त्यापूर्वी दहा वर्ष शीला दीक्षित यांच्या नेतृत्वात काँग्रेसची सत्ता होती. त्यामुळे एकीकडे केंद्रासह अनेक राज्य ताब्यात असताना दिल्ली मिळवता येत नाही, हे भाजपचे दुखणे आहे. म्हणूनच अन्य पक्ष महाराष्ट्र, झारखंड या राज्यांमध्ये संपूर्ण ताकद पणाला लावत असताना भाजपने या दोन राज्यांसोबतच राजधानी दिल्लीतही तयारी सुरू केली आहे.संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचे बिगुल अखेर वाजले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. येत्या 20 नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक पार पडणार आहे. तर 23 नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचे निकाल घोषित होतील. केंद्रीय निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत याबद्दलची मोठी घोषणा केली आहे. विधानसभा निवडणुकांची घोषणा होताच महाराष्ट्रात आचारसंहिताही लागू झाली आहे. महाराष्ट्रातील विधानसभेची मुदत 26 नोव्हेंबर रोजी संपणार आहे. तर 4 जानेवारी 2025 पर्यंत झारखंड विधानसभेची मुदत आहे. सणासुदीच्या काळात निवडणुकांची घोषणा केली जात नाही. यंदा दिवाळी 29 ऑक्टोबर ते 3 नोव्हेंबर या कालावधीत आहे. त्यामुळे दिवाळीनंतर 20 नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रात विधानसभा होणार आहे. यंदा महाराष्ट्रात एकाच टप्प्यात निवडणुका होणार आहेत.महाराष्ट्र विधानसभा निवडणूक ही एकाच टप्प्यात होणार आहे. संपूर्ण राज्यात एकाच दिवशी मतदान पार पडणार आहे. महाराष्ट्रात 20 नोव्हेंबरला मतदान पार पडणार आहे. तर 23 नोव्हेंबरला मतमोजणी केली जाईल, अशी महत्वाची माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली. विधानसभेच्या निवडणुकीसाठी अर्ज करण्याची तारीख ही 22 ऑक्टोबरपासून सुरु होईल. उमेदवार 29 ऑक्टोबरपर्यंत आपला अर्ज दाखल करु शकणार आहेत. यानंतर 30 ऑक्टोबरला सर्व उमेदवारांच्या अर्जाची छाननी होईल. तर 4 नोव्हेंबर 2024 ला पर्यंत उमेदवार आपला उमेदवारी अर्ज मागे घेऊ शकणार आहेत, अशी माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली आहे. 25 नोव्हेंबरपर्यंत निवडणुकीचा कार्यक्रम पूर्ण होणार आहे.महाराष्ट्रात विधानसभेच्या एकूण 288 जागा आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप आणि शिवसेना एकत्रितपणे लढले होते. तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांचीही युती होती. पण यंदा हे चित्र पूर्णपणे बदललं आहे. 2019 मध्ये झालेल्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत भाजप 105 जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला होता. तर शिवसेनेने 56 जागांवर विजय मिळवला होता. त्यापाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस 54 जागांसह तिसऱ्या आणि काँग्रेस 44 आमदारांसह चौथ्या स्थानावर होती.2019 मधील निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे यांनी वेगळी भूमिका घेतली होती. उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत महाविकासआघाडी स्थापन केली. त्यानंतर उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री झाले. मात्र अडीच वर्षानंतर एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केली आणि शिवसेनेच्या 40 आमदारांसह पुन्हा भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला. शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी बंड केल्याने सत्तेत असलेलं महाविकास आघाडी सरकार कोसळलं. यानंतर अजित पवार राष्ट्रवादीत बंड करत महायुतीत सहभागी झाले.

### निवडणुकांचा कार्यक्रम कसा

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक ही एकाच टप्प्यात होणार आहे. संपूर्ण राज्यात एकाच दिवशी मतदान पार पडणार आहे. महाराष्ट्रात 20 नोव्हेंबरला मतदान पार पडणार आहे. तर 23 नोव्हेंबरला मतमोजणी केली जाईल, अशी महत्वाची माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली. विधानसभेच्या निवडणुकीसाठी अर्ज करण्याची तारीख ही 22 ऑक्टोबरपासून सुरु होईल. उमेदवार 29 ऑक्टोबरपर्यंत आपला अर्ज दाखल करु शकणार आहेत. यानंतर 30 ऑक्टोबरला सर्व उमेदवारांच्या अर्जाची छाननी होईल. तर 4 नोव्हेंबर 2024 ला पर्यंत उमेदवार आपला उमेदवारी अर्ज मागे घेऊ शकणार आहेत, अशी माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली आहे. 25 नोव्हेंबरपर्यंत निवडणुकीचा कार्यक्रम पूर्ण होणार आहे.

### महाराष्ट्रात कधी होणार निवडणूक?

महाराष्ट्रात एका टप्प्यात निवडणूक घेतली जाणार आहे. २० नोव्हेंबरला एका टप्प्यात निवडणूक घेतली जाणार आहेत. तर २३ नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी ही माहिती दिली आहे. गॅझेट नोटिफिकेशनची तारीख २२ ऑक्टोबर असेल तर २९ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख असेल. ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी केली जाणार आहे. तर अर्ज मागे घेण्याची तारीख ४ नोव्हेंबर २०२४ अशी असणार आहे. २० नोव्हेंबरला महाराष्ट्राची निवडणूक एका टप्प्यात होईल. तर २३ नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागेल.

### महाराष्ट्र विधानसभा निकाल 2019 पक्षीय बलाबल काय?

| 105 | 56 | 54 | 44 | 03 | 02 | 02 | 02 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 13 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भाजप | शिवसेना | राष्ट्रवादी | काँग्रेस | बविआ | प्रहार | एमआयएम | समाजवादी | मनसे | माकप | जनसुराज्य | शेकाप | रासप | स्वाभिमानी | अपक्ष |

# पाय जमिनीवर ठेवा : राहुल गांधी

## महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांना इशारा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**८ ऑक्टोबरला हरियाणा आणि जम्मू काश्मीर या दोन राज्यांचे निकाल लागले. हरियाणात काँग्रेस जिंकणार असे अंदाज सगळ्या एक्झिट पोल्सनी वर्तवले होते. मात्र सगळे अंदाज फोल ठरवत हरियाणात भाजपाने बाजी मारली. भाजपाला हरियाणात सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळाली आहे.**



यानंतर आता महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक आजच जाहीर झाली आहे. २० नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणूक होणार आहे तर २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे. याआधी सोमवारी काँग्रेस नेत्यांची एक बैठक सोमवारी दिल्लीत पार पडली. या बैठकीत महाराष्ट्रातल्या काँग्रेसच्या दिग्गजांना पाय जमिनीवर ठेवण्याचा सल्ला राहुल गांधींनी दिला आहे. सोमवारी दिल्लीत एक बैठक पार पडली. या बैठकीत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातल्या दिग्गज नेत्यांना हरियाणाच्या निकालातून शिका आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या वेळी पाय जमिनीवर ठेवा असं बजावलं आहे अशी माहिती समोर आली आहे. अतिआत्मविश्वासामुळे सत्ता हातातून जाते, महाराष्ट्राच्या बाबतीत ही चूक करु नका. हरियाणात दुधाने पोळल्याने आता राहुल गांधींनी महाराष्ट्रातल्या नेत्यांना ताकही फुंकून पिण्याचा सल्ला दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होते आहे. तसंच प्रत्येक पाऊल उचलताना काळजी घ्या असंही राहुल गांधींनी या बैठकीत बजावल्याचं कळतं आहे.काँग्रेससह इंडिया आघाडीने लोकसभा निवडणुकीत भाजपाचा विजयी रथ रोखण्यात बऱ्याच अंशी यश मिळवलं. त्यानंतर काँग्रेस पक्ष हरियाणा आणि जम्मू काश्मीर या ठिकाणी झालेल्या निवडणुकीला सामोरा गेला होता. तसंच आता आज जाहीर झाल्याप्रमाणे महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यांच्या निवडणुका पुढच्या महिन्यात पार पडत आहेत. या दरम्यान राहुल गांधी यांनी आस्ते कदमचा सल्ला काँग्रेसच्या नेत्यांना दिला आहे. महाराष्ट्र आणि झारखंड येथील निवडणुकांना सामोरे जाताना अतिआत्मविश्वास बाळगू नका, पाय जमिनीवर ठेवा असं राहुल गांधींनी काँग्रेसच्या महाराष्ट्रातील नेत्यांना सांगितलं आहे.महाराष्ट्रात महाविकास आघाडी आहे ज्यामध्ये शिवसेना (उद्धव ठाकरे), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे तीन पक्ष एकत्र आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने चांगली कामगिरी केली आहे. महाराष्ट्रातल्या ४८ जागांपैकी ३१ जागा महाविकास आघाडीला मिळाल्या आहेत. लोकसभेत चांगलं यश मिळाल्याने महाविकास आघाडीचा आत्मविश्वास दुणावला आहे. मात्र राहुल गांधींनी आता महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हुरळून न जाण्याचा आणि हरियाणाच्या निकालातून शिकण्याचा सल्ला दिला आहे.यानंतर आता महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक आजच जाहीर झाली आहे. २० नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणूक होणार आहे तर २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे. याआधी सोमवारी काँग्रेस नेत्यांची एक बैठक सोमवारी दिल्लीत पार पडली.

### आस्ते कदमचा सल्ला

काँग्रेससह इंडिया आघाडीने लोकसभा निवडणुकीत भाजपाचा विजयी रथ रोखण्यात बऱ्याच अंशी यश मिळवलं. त्यानंतर काँग्रेस पक्ष हरियाणा आणि जम्मू काश्मीर या ठिकाणी झालेल्या निवडणुकीला सामोरा गेला होता. तसंच आता आज जाहीर झाल्याप्रमाणे महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यांच्या निवडणुका पुढच्या महिन्यात पार पडत आहेत. या दरम्यान राहुल गांधी यांनी आस्ते कदमचा सल्ला काँग्रेसच्या नेत्यांना दिला आहे. महाराष्ट्र आणि झारखंड येथील निवडणुकांना सामोरे जाताना अतिआत्मविश्वास बाळगू नका, पाय जमिनीवर ठेवा असं राहुल गांधींनी काँग्रेसच्या महाराष्ट्रातील नेत्यांना सांगितलं आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडी आहे.

### अतिआत्मविश्वासामुळे सत्ता जाते

महाराष्ट्रातल्या काँग्रेसच्या दिग्गजांना पाय जमिनीवर ठेवण्याचा सल्ला राहुल गांधींनी दिला आहे.सोमवारी दिल्लीत एक बैठक पार पडली. या बैठकीत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातल्या दिग्गज नेत्यांना हरियाणाच्या निकालातून शिका आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या वेळी पाय जमिनीवर ठेवा असं बजावलं आहे अशी माहिती समोर आली आहे. अतिआत्मविश्वासामुळे सत्ता हातातून जाते, महाराष्ट्राच्या बाबतीत ही चूक करु नका. हरियाणात दुधाने पोळल्याने आता राहुल गांधींनी महाराष्ट्रातल्या नेत्यांना ताकही फुंकून पिण्याचा सल्ला दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होते आहे.

---

# कॅनडात राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घाला

## न्यू डेमोक्रॅटिक पार्टीचे प्रमुख जगमीत सिंगची मागणी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**निज्जर हत्याप्रकरणात भारतीय उच्चायुक्त संजय कुमार वर्मा आणि इतर अधिकाऱ्यांचा समावेश आहे, असा गंभीर आरोप कॅनडाने पुन्हा एकदा केला असून भारतीय उच्चायुक्तांना देश सोडण्यास परत जाण्यास सांगितलं आहे. यालाच प्रत्युत्तर म्हणून भारतानेही कॅनडाच्या उच्चायुक्तांसह सहा राजनैतिक अधिकाऱ्यांना भारत सोडण्याचे आदेश दिले आहेत.**

या प्रकरणावरून दोन्ही देशातील संबंध कमालीचे ताणले गेले असताना कॅनडातील न्यू डेमोक्रॅटिक पार्टीच्या प्रमुखांनी कॅनडात राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालावी, अशी मागणी केली आहे. त्यांच्या या मागणीनंतर आता विविध राजकीय चर्चांना उधाण आलं आहे. न्यू डेमोक्रॅटिक पार्टीचे प्रमुख जगमीत सिंग यांनी एक्स समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. निज्जर हत्याप्रकरणी रॉयल कॅनेडियन माउंटेड पोलिसांनी जी माहिती दिली आहे, ती धकादायक आहे. त्यामुळे न्यू डेमोक्रॅटिक पार्टीत चिंतेत आहे. या प्रकरणामुळे कॅनडातील शिख समुदायातही भीतीचं वातावरण आहे, असे ते म्हणाले. कॅनडाचे नागरिक हरदीपसिंग




निज्जर यांच्या हत्येत नरेंद्र मोदी सरकारच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे, असा आरोप कॅनडा काही महिन्यांपासून करतो आहे. त्याचे पुरावेदेखील आमच्याकडे आहेत. मात्र, याप्रकरणी अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. हे दुर्देवी आहे. आम्ही कॅनडातील प्रत्येक नेत्याला विनंती करतो, त्यांनी या कृत्यासाठी नरेंद्र सरकारला जबाबदार धरावे. तसेच त्यांना जाब विचारावा. कॅनडाच्या नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करणं, ही न्यू डेमोक्रॅटिक पार्टीची प्राथमिकता आहे, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली.कॅनडा सरकारने कॅनडातील भारतीय उच्चायुक्तांना परत पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही या निर्णयाचं स्वागत करतो. तसेच आम्ही कॅनडाच्या सरकारला विनंती करतो की त्यांनी भारतावर विविध निर्बंध लागू करावेत. याशिवाय कॅनडा सरकारने कॅनडात राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरही बंदी घालावी आणि कॅनडातील नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करावी, खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्यामागे भारताचा हात असल्याचा आरोप कॅनडाने वर्षभरापूर्वी केला.

### भारताने आरोप फेटाळून लावले

होता. मात्र, भारताने कॅनडाचे आरोप फेटाळून लावले होते. अशातच कॅनडाने पुन्हा एकदा या प्रकरणाचा उल्लेख करत भारतीय उच्चायुक्त संजय कुमार वर्मा आणि इतरांचा या प्रकरणाच्या तपासात सहभाग असल्याचा आरोप केले. यामध्ये कार्यवाहक उच्चायुक्त स्टीवर्ट रॉस व्हीलर, उपउच्चायुक्त पॅट्रिक हेबर्ट, प्रथम सचिव मेरी कॅथरीन जोली, प्रथम सचिव लॅन रॉस डेव्हिड ट्राइट्स, प्रथम सचिव अॅडम जेम्स चुइप्का, प्रथम सचिव पॉला ओरजुएला यांचा समावेश आहे.

# रिचानं नेटकऱ्यांचे टोचले कान



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री ऐश्वर्या रॉय ही काही दिवसांपूर्वी एका वेगळ्या कारणामुळे चर्चेत आली होती. तिनं पॅरिसच्या फॅशन वीकमध्ये रॅम्प वॉक केले होते. त्यातील काही फोटो व्हायरल झाले होते. त्यावरुन ऐश्वर्याला ट्रोल करण्यात आले होते. या सगळ्यात अभिनेत्री रिचानं ऐश्वर्याची बाजू घेतली आहे. यापूर्वी ऐश्वर्या आणि रिचानं सरबजितमध्ये एकत्र काम केले होते. त्या चित्रपटामध्ये रणदीप हुडानं केलेली भूमिका लोकप्रिय ठरली होती. रणदीपच्या भूमिकेचे मोठ्या प्रमाणावर कौतुकही झाले होते. ऐश्वर्या जेव्हा त्या पॅरिसच्या रॅम्प वॉकमध्ये सहभागी झाली होती तेव्हा तिला ट्रोल करण्यात आले होते. या सगळ्यावर ऐश्वर्यानं तिला ट्रोल करणाऱ्यांवर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. फुकरे तीन मधून भोली पंजाबनच्या भूमिकेत असणाऱ्या रिचाची लोकप्रियता मोठी आहे. तिचा चाहतावर्गही मोठा आहे. रिचा ही नेहमीच तिच्या सडेतोड प्रतिक्रियेसाठी ओळखली गेलेली सेलिब्रेटी आहे. एका मुलाखतीमध्ये रिचाला ऐश्वर्या रॉयच्या ट्रोलिंगवरुन प्रश्न विचारण्यात आला होता.

# आलिया भट्टची खास पोस्ट



अभिनेता रणबीर कपूर (RANBIR KAPOOR) यांची मुलगी राहाचा आज पहिला वाढदिवस आहे. तिच्या वाढदिवसानिमित्त कपूर कुटुंबीयांनी सोशल मीडियावर खास पोस्ट शेअर केला आहेत. आता लेकीच्या वाढदिवसानिमित्त आलियानं नुकतीच एक स्पेशल पोस्ट शेअर केली आहे. आलियानं सोशल मीडियावर शेअर केलेल्या फोटोंनी अनेकांचे लक्ष वेधले आहेत. आलिया भट्टनं सोशल मीडियावर काही खास फोटो शेअर केले आहेत. या फोटोमध्ये राहानं एका केकवर हात ठेवलेला दिसत आहे. तर दुसऱ्या फोटोमध्ये राहानं हातात फुल धरलेलं दिसत आहे. आलियानं सोशल मीडियावर शेअर केलेल्या फोटोमध्ये राहाचा चेहरा दिसत नाहीये. आलियानं फोटोला कॅप्शन दिलं, "आमचा आनंद, आमचं आयुष्य आणि आमच्या जीवनातील प्रकाश, आपण हे गाणं ऐकत आहोत आणि तू माझ्या पोटात लाथा मारत आहेस, हे सर्व परवा घडलं असं मला वाटत आहे. माझ्याकडे भावना मांडण्यासाठी शब्द नाहीत पण तू आमच्या आयुष्यात आहेस, हे आमचं भाग्य आहे. तू आम्हाला एका चविष्ट केकच्या तुकड्याप्रमाणे वाटत आहेस. वाढदिवसाच्या शुभेच्छा बेबी टायगर, आम्ही तुझ्यावर खूप प्रेम करतो." राहाची आजी नीतू कपूर आणि सोनी राजदान यांनी देखील सोशल मीडियावर पोस्ट शेअर केल्या आहेत. आलियाची आई सोनी राजदान यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये लिहिलं आहे.

# शुभमन गिलला डेट करतेय का? विचारताच सारा हसली

गेल्या काही दिवसापासून करण जोहर त्याचा लोकप्रिय टॉक शो कॉफी विथ करण मुळे चर्चेत आहे. यंदा कॉफी विथ करणचा 8 वा सीझन आहे. आतापर्यंत या शोचे दोन भाग रिलिज झाले आहेत. या भागाची सुरुवात दीपिका पादूकोण आणि रणवीर सिंहच्या जोडीने झाली. त्यानंतर या शोमध्ये देओल भावंडं आलीत. आता या सिझनचा तीसरा एपिसोड रिलिज होणार आहे ज्यात दोन मैत्रिणीची जोडी पहायला मिळणार आहे. करणच्या शोमध्ये आता येणारी पुढची जोडी आहे सारा अली खान आणि अनन्या पांडेची. या शो दरम्यान करण जोहर सारा आणि अनन्याला त्यांच्या लव्ह लाईफबद्दल विचारताना दिसला. यावेळी करण आणि साराने अनन्या चिडवले. तर तिनेही तिच्या आणि आदित्यच्या डेटिंगवर चर्चा केली. निर्मात्यांनी शो चा एक प्रोमो सोशल मिडियावर शेयर केला आहे ज्यात सारा अली खान ही तिच्या आणि शुभमन गिलच्या डेटिंग अफवांवर स्पष्टपणे बोलताना दिसली. मात्र यावेळी तिने एक मोठी हिंटही दिली. करण जोहरने देखील त्याच्या इंस्टाग्रामवर शोचा नवीनतम प्रोमो पोस्ट केला आहे. या व्हिडिओमध्ये तो सारा अली खान आणि अनन्या पांडेसोबत बोलताना दिसत आहे. या व्हिडिओमध्ये करण साराला विचारतो की, तुझ्या आणि शुभमन गिलच्या डेटिंगबद्दल खूप अफवा पसरत आहे यावर उत्तर देताना सारा अली खान हसते आणि म्हणते, " सारा का सारा दुनिया गलत सारा के पीछे पडा है". त्यानंतर सर्वच हसतात. काही दिवसांपूर्वी भारतीय क्रिकेटर शुभमन गिल आणि सारा अली खान यांना एकत्र पाहिल्यानंतर दोघांच्या डेटिंगच्या अफवा पसरल्या होत्या. मात्र त्यावेळीही साराने या अफवा खोट्या असल्याच्या सांगितल्या होत्या. मात्र त्यानंतर शुभमन गीलचे नाव सचिन तेंडुलकरची मुलगी सारा तेंडुलकरसोबत जोडले गेले होते. सारा तेंडुलकर आणि शुभमनला अनेकवेळा एकत्र स्पॉट करण्यात आले आहे. त्याचे व्हिडिओ आणि फोटोही खुप व्हायरल झाले होते. त्यातच अलीकडेच सारा तेंडुलकर एका मॅचमध्ये शुभमन गिलला चिअर करण्यासाठी आली होती. त्यावेळी गीलच्या अर्धशतकावर साराने स्टँडिंग ओव्हेशन दिले. त्यामुळे दोघांच्या डेटिंगच्या अफवांना पुन्हा हवा मिळाली. आता त्यातच करण जोहरच्या शोमध्ये सारा अली खानने सर्व लोक चुकीच्या सारा मागे धावत असल्याचं सांगितलं. आता यामुळे साराच्या या वक्तव्यानंतर शुभमन सारा अली खानला नाही तर सारा तेंडुलकरला डेट करत असल्याची हिंट सारा अली खानने दिल्याचे बोलले जात आहे.

# ये रिश्ता क्या कहलाता है'ची अभिरा असं का म्हणते?

टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री अभिरा उर्फ समृद्धी ही एका वेगळ्याच कारणासाठी चर्चेत आली आहे. तिनं एका मुलाखतीमध्ये जी प्रतिक्रिया दिली आहे त्यामुळे ती चाहत्यांच्या चर्चेचा विषय आहे. ती काय म्हणाली आहे हे आपण जाणून घेणार आहोत. अभिरा म्हणते, ये रिश्ता क्या कहलाता है या मालिकेची लोकप्रियता तुम्हाला दिसते. पण त्यामागील कलाकारांची मेहनतही तितकीच महत्वाची आहे. "या मालिकेचा दर्जा जपण्यासाठी सर्वांचे महत्वाचे योगदान आहे. 'ये रिश्ता क्या कहलाता है' ही मालिका नेहमीच प्रेक्षकांच्या पसंतीला उतरली आहे. आम्ही सर्वांनी या मालिकेसाठी आमचे सर्वोत्तम योगदान दिले आहे. आम्हांला आशा आहे की, प्रेक्षकही आमच्यावर आणि आमच्या मालिकेवर प्रेमाचा वर्षाव करतील", अशा शब्दांत समृद्धी शुक्ला उर्फ अभिरानं तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत. 'स्टार प्लस' वाहिनीवरील लोकप्रिय मालिका 'ये रिश्ता क्या कहलाता है'चे




नवे पर्व आता सुरु होणार आहे. नव्या पर्वात, समृद्धी शुक्ला आणि शहजादा धामी हे कलावंत मुख्य भूमिका साकारत मालिकेचा समृद्ध वारसा पुढे नेणार आहेत. समृद्धी शुक्ला (अभिरा), शहजादा धामी (अरमान), प्रतीक्षा होनमुखे (रूही) आणि शिवम खजुरिया (रोहित) यांचा परिचय करून देणाऱ्या या मालिकेची एक चित्तवेधक झलक प्रेक्षकांना अलीकडेच पाहायला मिळाली. या 'प्रोमो'त मालिकेच्या कथानकाने एक अनपेक्षित वळण घेतल्याचे पाहायला मिळाले होते, ज्यात एका क्लेशकारक घटनेमुळे अभिरा आणि अरमान लग्नाची गाठ बांधतात खरे, पण तरीही अरमान मात्र आजही रुहीच्या प्रेमात आहे, जिचे अरमानच्या भावाशी- रोहितशी लग्न होते. मालिकेच्या नव्या अध्यायात अभिरा, अरमान, रूही आणि रोहित यांच्या आयुष्यात उलगडत जाणारे रंजक नाट्य प्रेक्षकांना गुंतवून ठेवेल. 'ये रिश्ता क्या कहलाता है' या मालिकेच्या नव्या पर्वात मुख्य भूमिका निभावणारी समृद्धी शुक्ला उर्फ अभिरा हिच्या बोलण्यातून मालिकेसंदर्भातील तिची उत्कंठा व्यक्त होत होती. ती म्हणाली, "ये रिश्ता क्या कहलाता है या मालिकेबाबत एकाच वेळी मला खूप कुतूहलही वाटतंय आणि मी अस्वस्थही आहे; परीक्षेच्या निकालाची वाट पाहताना जसे होते, तशी माझी अवस्था आहे.

# शमीला ऑस्ट्रेलियाला जाणं शक्य नाही

## रोहित शर्माने मोहम्मद शमीबद्दल केलं मोठं वक्तव्य

नवी दिल्ली । वृत्तसंस्था




**भारतीय संघ बुधवार १५ ऑक्टोबरपासून मायदेशात न्यूझीलंड संघाविरूद्ध कसोटी मालिका खेळणार आहे. या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना बेंगळुरू येथे होणार आहे. दरम्यान, सामन्याच्या एक दिवस आधी भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने पत्रकार परिषदेत अनेक प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. भारत-न्यूझीलंड या मालिकेबद्दल बोलताना रोहित शर्माने मोहम्मद शमीबाबत मोठा खुलासा केला आहे.**

रोहित शर्माने भारताचा महत्त्वाचा वेगवान गोलंदाज असलेल्या मोहम्मद शमीबद्दल मोठा खुलासा केला आहे. रोहित शर्माने दिलेल्या या वक्तव्याने भारतीय संघासमोर नक्कीच मोठ अडचण निर्माण झाली आहे. मोहम्मद शमी अजूनही दुखापतीतून सावरलेला नाही. तो आता सुरू होणाऱ्या न्यूझीलंड मालिकेचा भाग तर नाही, पण पुढील मालिकेत खेळू शकेल की नाही यावरही प्रश्नचिन्ह आहे.मोहम्मद शमीबद्दल बोलताना रोहित शर्माने सांगितलं, 'खरं सांगायचं तर ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर शमीबाबत निर्णय घेणं खूप अवघड आहे. त्याला आणखी एक धक्का बसला असून त्याच्या गुडघ्याला पुन्हा सूज आली आहे. आता त्याला पुन्हा पहिल्यापासून सुरुवात करावी लागेल. शमी एनसीएमध्ये डॉक्टर आणि फिजिओच्या देखरेखीखाली आहे. दुखापत असलेल्या शमीला ऑस्ट्रेलियाला घेऊन जाऊ शकत नाही. तो लवकर दुखापतीतून सावरेल अशी आशा आहे. मोहम्मद शमीच्या दुखापतीबद्दल अलीकडे आलेला रिपोर्ट काही प्रमाणात खरा असल्याचे रोहित शर्माच्या या विधानावरून खरा होता, अशीही चर्चा आहे.शमीला पुन्हा दुखापत झाल्याची बातमी सोशल मीडियावर पसरली तेव्हा गोलंदाजाने लिहिले होते की, अशा निराधार अफवा का पसरवल्या जात आहेत आणि मी बरा होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. शमी म्हणाला की, बीसीसीआय आणि मी बॉर्डर-गावसकर मालिकेतून बाहेर असल्याचे म्हटलेले नाही. शमीने चाहत्यांना अशा बातम्यांकडे लक्ष देऊ नये असेही आवाहन केले होते. ऑस्ट्रेलियाविरुद्धची कसोटी मालिका पाच सामन्यांची असणार आहे. तर बॉर्डर गावसकर ट्रॉफी कसोटी मालिका वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतर्गत होणार आहे. पुढील वर्षी होणाऱ्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमध्ये कोणते संघ अंतिम फेरीत खेळतील हे या मालिकेतून निश्चित होण्याची शक्यता आहे. सध्या भारत आणि ऑस्ट्रेलिया यासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहे. पण एखाद्या सामन्याच्या निकालानेही पूर्ण गुणतालिकेत बदल घडून येऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक सामना अत्यंत महत्त्वाचा असणार आहे. भारतीय कर्णधार रोहित शर्माने मंगळवारी न्यूझीलंडविरुद्धच्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी जसप्रीत बुमराहची उपकर्णधारपदी नियुक्ती केली आहे. त्याने मुख्य वेगवान गोलंदाजाला नेतृत्व गटाचा अविभाज्य भाग असल्याचे सांगितले आहे, ज्याला खेळाची उत्तम समज आहे. बुमराहला बुधवारपासून येथे सुरू होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी उपकर्णधार घोषित करणे हे आश्चर्यकारक होते, कारण बांगलादेशविरुद्ध नुकत्याच झालेल्या मालिकेत रोहितबरोबर भारताचा कोणीही उपकर्णधार नव्हता. ऑस्ट्रेलिया दौऱ्यातही बुमराह भारताचा उपकर्णधार होईल, यासह रोहितला बुमराहबाबत प्रश्न विचारण्यात आला होता.पीटीआयने १० ऑक्टोबर रोजी सांगितले होते की रोहित वैयक्तिक कारणांमुळे ऑस्ट्रेलियातील किमान एका कसोटी सामन्यातून बाहेर राहिल. रोहितने सामन्यापूर्वी पत्रकार परिषदेत बुमराहला सांगितले की, "बुमराह खूप क्रिकेट खेळला आहे. मी त्याच्याबरोबर खूप क्रिकेट खेळलो आहे. त्याला खेळाची चांगली समज आहे. डावपेचांवर मी फार काही बोलू शकत नाही, कारण त्याने फार वेळा संघाचे नेतृत्त्व केलेले नाही. त्याने एक कसोटी आणि काही कसोटी सामन्यांमध्ये कर्णधारपद भूषवले आहे.

परंतु, जेव्हा सामन्याबाबत त्याच्याशी चर्चा करतो, तेव्हा जाणवतं की त्याला खेळ तर समजतो पण सामन्यात त्या घडीला काय आवश्यक आहे, हेही त्याला नीट कळतं. जेव्हा अशी स्थिती निर्माण होईल जिथे तुम्हाला सामन्यात पुढे जाण्यासाठी एका योग्य नेतृत्वाची गरज आहे.

### भारताचा 7 वेळा पराभव

भारताने न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर १७ कसोटी जिंकल्या आहेत. टीम इंडियाने अद्याप घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्ध एकही कसोटी मालिका गमावलेली नाही. दोन्ही संघांमध्ये खेळल्या गेलेल्या सर्व कसोटी मालिकेत टीम इंडियाचा कायमच वरचढ राहिलेला आहे. भारताने न्यूझीलंडविरुद्ध १२ कसोटी मालिका जिंकल्या आहेत, तर किवी संघाने कसोटी मालिकेत भारताचा ७ वेळा पराभव केला आहे. यामध्ये जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या पहिल्या सीझनमधील अंतिम सामन्याचाही समावेश आहे, इंग्लंडमध्ये भारताचा पराभव करून प्रथमच जागतिक कसोटी चॅम्पियनशिप जिंकली.

# पदार्पणवीर कामरान गुलामने शतक झळकावले

## गुलामने पहिले कसोटी शतक झळकावत इतिहास घडवला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**मुलतानमध्ये पाकिस्तान वि इंग्लंड यांच्यात दुसरा कसोटी सामना खेळवला जात आहे. या सामन्यापूर्वी पाकिस्तानच्या कसोटी संघात धक्कादायक बदल केले गेले. पाकिस्तानचा स्टार फलंदाज बाबर आझम, शाहीन शाह आफ्रिदी आणि नसीम शाह या खेळाडूंना कसोटी संघातून वगळण्यात आले. त्याऐवजी इतर नव्या खेळाडूंना संध देण्यात आली आहे. संघात संधी दिलेल्या पदार्पणवीर कामरान गुलाम याने शतक झळकावले आहे.**

कामराननें १९२ चेंडूत चौकारासह १०२ धावा करत आपले पहिले कसोटी शतक झळकावत इतिहास घडवला.कामराननें पहिल्याच कसोटी सामन्यात शतक झळकावले आहे. कामरानचा हा पहिलाच कसोटी सामना असून त्याने पहिल्या डावातच शतक झळकावून इतिहास घडवला आहे. ५ वर्षांनंतर पाकिस्तानच्या एखाद्या फलंदाजाने पदार्पणाच्या कसोटीत शतक झळकावण्याचा पराक्रम केला आहे. कामरान गुलामचे हे शतकही खास आहे कारण बाबर आझमच्या जागी या फलंदाजाला प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळाली. मुलतान कसोटीची सुरूवात पाकिस्तानसाठी फारशी चांगली झाली नाही. संघाने १० षटकांत अब्दुल्ला शफीक आणि शान मसूद यांच्या विकेट्स गमावल्या. दबावाच्या वातावरणात कामरान गुलामने क्रीझवर पाऊल ठेवले. या उजव्या हाताच्या फलंदाजाने १५व्या चेंडूवरच षटकार ठोकून आपला फॉर्म दाखवून दिला. यानंतर गुलामने १०४ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. तत्पूर्वी, या खेळाडूने सॅम अयुबबरोबर तिसऱ्या विकेटसाठी शतकी भागीदारी केली.

### सॅम अयुब 77 धावांची खेळी

सॅम अयुब ७७ धावांची खेळी करत बाद झाला. त्याची विकेट पडल्यानंतर पाकिस्तानला सौद शकीलच्या रूपाने मोठा धक्का बसला पण कामरान क्रीजवरच पाय घट्ट रोवून उभा होता.पदार्पणाच्या कसोटीत शतक झळकावणारा कामरान गुलाम हा १३वा पाकिस्तानी फलंदाज आहे. तसेच, पाकिस्तानमध्ये ही कामगिरी करणारा तो ११वा खेळाडू आहे. इंग्लंडविरुद्ध पदार्पणाच्या कसोटीत शतक झळकावणारा तो पहिला पाकिस्तानी खेळाडू आहे.